MHPA160016942025

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१२३/२०२५ मधील निशाणी क्र.१ खालील आदेश**

(कमल व ईतर विरुध्द निरंक)

अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज मुंबई विनिमयन (Regulation) अधिनियम, १८२७ चे कलम २ नुसार वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराचे थोडक्यात कथन खालील प्रमाणे.

अर्जदार क्र.०१ यांचे पती व अर्जदार क्र.०२ ते ०५ यांचे वडील नामे ज्ञानोबा नारायण राठोड, हे दिनांक १२.१२.२०२४ रोजी टाकळगव्हाण तांडा, ता. पाथरी, जि. परभणी येथे मयत झाले. मयताचे सर्वसाधारण राहण्याचे ठिकाण हे टाकळगव्हाण तांडा, ता. पाथरी, जि. परभणी असे होते. अर्जदार क्र.०१ ही मयताची पत्नी आहे, अर्जदार क्र.०२ ते ०५ हे मयताचे अनुक्रमे मूले व मूली आहेत. अर्जदांराशिवाय मयताला इतर कोणीही वारस नाहीत. अर्जदांराना ते मयताचे कायदेशीर वारस म्हणून ओळखण्यासाठी वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे, अर्जदांरानी प्रस्तुत अर्ज दाखल करुन वारसा प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात देण्याची विनंती केलेली आहे.

३. प्रस्तुत प्रकरणी, दैनिक 'गाववाला' या वर्तमानपत्रामध्ये दिनांक २८ ऑगस्ट २०२५ रोजी अर्जदाराच्या मागणीसंबंधी जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात आले. सदर वर्तमानपत्राचा अंक निशाणी क्र.१८ वर दाखल करण्यात आला आहे.

४. साक्षीदार क्र.०१ तथा अर्जदार अनिल ज्ञानोबा राठोड, यांनी त्यांच्या अर्जाच्या सिध्दतेसाठी स्वतःचे सरतपासाचे शपथपत्र नि.क्र.१९ वर दाखल केलेले आहे. तसेच, मयत ज्ञानोबा नारायण राठोड, यांचे पडताळलेले मृत्यूप्रमाणपत्र नि.क्र.११ वर, मयत यांचे पडताळलेले आधारकार्ड प्रत नि.क्र.१२, अर्जदार यांचे पडताळलेले आधारकार्ड प्रत नि.क्र.१३ ते १७ वर दाखल केलेले आहे. तसेच नि.क्र.२० वर साक्षीपुरावा बंद केल्याची पुरसीस दाखल केली आहे.

५. मी अर्जदारातर्फे श्री. आर.ए.महिपाल, विधीज्ञ यांचा युक्तीवाद श्रवण केला. तसेच, अभिलेखावरील कागदपत्रांचे सूक्ष्मपणे अवलोकन केले.

६. अभिलेखावरील पुराव्याचे व कागदपत्रांचे अवलोकन केले असता, अर्जदाराने त्याच्या अर्जातील कथनांचा त्यांच्या पुराव्याच्या शपथपत्रामध्ये पुनरुच्चार करुन पुष्टी देणारा पुरावा दिला आहे. अर्जदाराच्या पुराव्याचे व अभिलेखावर नि.क्र.११ वर दाखल असलेल्या

मृत्यू प्रमाणपत्राचे अवलोकन कले असता असे दिसून येते की, अर्जदार क्र.०१ यांचे पती व अर्जदार क्र.०२ ते ०५ यांचे वडील मयत नामे ज्ञानोबा नारायण राठोड, हे दिनांक १२.१२.२०२४ रोजी मयत झाले आहेत. अर्जदार क्र.०१ ही मयताची पत्नी, अर्जदार क्र.०२ ते ०५ हे मयताचे अनूक्रमे मूले व मूली आहेत. प्रस्तुत प्रकरणी नि.क्र.१८ वर दाखल असलेल्या ''दैनिक गाववाला'' या वर्तमानपत्रामध्ये अर्जदारांच्या मागणीबाबत जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात आले होते व त्याद्वारे मयतास अर्जदाराशिवाय इतर कोणी वारस असतील तर त्यांनी त्यांच्या हरकती कळविण्याबाबत जाहीर करण्यात आले होते. परंतु, सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द होऊनही अर्जदारांच्या मागणीबाबत मुदतीमध्ये कुणीही हरकत वा आक्षेप दाखल केलेला नाही; करिता, अर्जदारांचा पुरावा विनाआव्हानित राहिला.

७. सबब, अभिलेखावर उपलब्ध असलेली कागदपत्रे व पुरावा यांचा विचार करता असे दिसून येते की, अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस आहेत. म्हणून वारसा प्रमाणपत्र अर्जदारांच्या हक्कात देणे योग्य व न्यायोचित होईल. सबब, मी न्यायाच्या दृष्टीकोनातून खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र.०१ ते ०५ हे मयत नामे ज्ञानोबा नारायण राठोड, यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत केवळ ओळख म्हणून त्यांना वारसा प्रमाणपत्र देण्यात येते. याशिवाय अर्जदारास सदर प्रमाणपत्राचा उपयोग करता येणार नाही.

३. अर्जदारास सदर वारसा प्रमाणपत्राचा उपयोग कुठल्याही प्रकारच्या अचल संपत्तीच्या हस्तांतरणासाठी करता येणार नाही.

४. मुंबई विनियमन अधिनियमाचे कलम ३ व ८ नुसार अर्जदाराकडून आवश्यक ते न्यायालयीन शुल्क घेऊन वारसा प्रमाणपत्र अर्जदारास देण्यात यावे.

(खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आले.)

दिनांकः १०.०६.२०२६

(**एम.एस.काझी**),
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, पाथरी